महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीने सभागृहास सादर केलेल्या अहवालांतील <u>शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत....</u>

समितीचा सातवा अहवाल

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : विसआ-२०१७/३४८/प्र.क्र.१७६/सहा
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०७ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा</u> :- १) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्र. विसआ-२०१५/प्र.क्र.३०/सहा, दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५.
२) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक-विसआ-२०१६/प्र.क्र.११/सहा, दिनांक २६ मे, २०१६.
३) शासन परिपत्रक, संसदीय कार्य विभाग, क्रमांक-विसआ-२०१७/५/प्र.क्र.४/सहा, दिनांक १२ जानेवारी, २०१७.

<u>शासन परिपत्रक</u> :-

सन २००६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१४ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील उर्वरीत प्रलंबित आश्वासनासंबंधीचा सातवा अहवाल दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी विधान सभागृहात सादर करण्यात आला असून, प्रस्तुत अहवालात आश्वासन समितीने नमूद केलेल्या शिफारशीनुसार, विधानमंडळाच्या सभागृहात शासनाच्या वतीने मा. मंत्री / मा. राज्यमंत्री महोदयांनी दिलेली आश्वासने याची पूर्तता ९० दिवसांच्या विहित मुदतीत व परिपूर्णपणे करणे ही शासनाची वैधानिक जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने विधानसभा आश्वासन समितीने त्यांच्या अहवालात दिलेल्या अभिप्राय/शिफारशींनुसार मंत्रालयीन विभागांनी **<u>त्वरीत</u>** कार्यवाही करण्यासाठी या विभागामार्फत यापूर्वी वेळोवेळी पत्र, शासन परिपत्रक, शासन निर्णय याद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या या विभागाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत. तथापि, आश्वासन समितीने दिलेल्या निदेशांचे अनुपालन होत नसल्याने, त्या संदर्भात आश्वासन समितीने सादर केलेल्या सातव्या अहवालात पुनश्च: **<u>तीव्र नापसंती</u>** व्यक्त केली आहे आणि आश्वासन पूर्ततेबाबतची कार्यवाही मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी विहित कालमर्यादेत व परिपूर्णपणे करण्याकरीता समितीने महत्त्वाच्या शिफारशी केल्या असून त्या पुढीलप्रमाणे आहेत व त्या शिफारशींकडे सर्व विभागांचे लक्ष पुन्हा वेधण्यात येत आहे :-

(अ) आश्वासनांची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा

बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून याबाबत शासनाने एक सर्वंकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुद्ध ठोस कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनांची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सरपणे विलंबाने करणाऱ्या संबंधित विभागाच्या उप सचिव / सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वंकष निर्णय घेऊन या संदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

(ब) दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव / प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव /सह सचिव यांचे समवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबत आढावा बैठका घेऊन मा. मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांसंदर्भात जी आश्वासने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी. तसेच, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(क) आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. या बाबींसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.

(ड) आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडुन समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मा. मंत्री / मा. राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेले आश्वासन व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबातचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये बऱ्याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारुन नेण्यासाठी समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता

करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी विवरणपत्रात आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत समिती गांभिर्याने घेत असून यापुढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणाऱ्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा. मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करुनच समितीकडे सादर करावीत व या संदर्भात शासनाने सर्वंकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करुन त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

२. आश्वासन समितीने यापूर्वीदेखील त्यांच्या इतर अहवालात केलेल्या शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना वेळोवेळी या विभागाकडून निर्गमित केल्या आहेत. तरी, समितीने आता केलेल्या **उपरोक्त (अ) ते (ड) येथील सर्व शिफारशींची गांभिर्याने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी दक्षता घ्यावी, जेणेकरुन आश्वासनांची पूर्तता विषयाशी सुसंगत, परिपूर्णरीतीने आणि विहीत मुदतीत होईल.**

प्रस्तुत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७०९१८१२५७०१४५१५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nijamoddin
Jahiroddin
Jamadar

Digitally signed by Nijamoddin Jahiroddin Jamadar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1a04c87922c611cd86db0417549c441857561c576c21b21f3c8d180884505e, serialNumber=2d8330a5714ce128e5b1288da65913bb6442fcd5a9326fcf969b743129edbe50, cn=Nijamoddin Jahiroddin Jamadar
Date: 2017.10.07 16:59:13 +05'30'

(एन. जे. जमादार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(२) मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(३) प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,(ड-१३ व ड-१४ शाखा), विधानभवन, मुंबई-४०० ०३२. (स्वतंत्र पत्राद्वारे)
(४) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(५) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
(६) निवड नस्ती.